शुक्रवार दि.१४ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत   संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१८० किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

## रेडी रेकनरचे दर ठरविताना स्थानिक परिस्थितीचा विचार

# १० ते १५ टक्के दरवाढ होणार असल्याच्या चर्चा निराधार-मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

रेडी रेकनर दरासंदर्भात सध्या संपूर्ण राज्यात सर्वेक्षण सुरू आहे. मागील काही वर्षांमध्ये काही भागांमध्ये रेडी रेकनर दर वाढले, तर काही ठिकाणी दर स्थिर ठेवण्यात आले. २०२३–२४ आणि २०२४–२५ मध्ये कोणतीही दरवाढ झालेली नाही. काही माध्यमांमध्ये १०–१५ टक्के दरवाढ होणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत, मात्र त्या निराधार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत सांगितले.विधानपरिषद सदस्य सर्वश्री सुनील शिंदे, ड.अनिल परब, सचिन अहिर यांनी मालमत्तांच्या खरेदी विक्री वेळी जमा होणाऱ्या मुद्रांक शुल्क संदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती.

राज्याच्या कोणत्याही भागात तडकाफडकी दरवाढ करण्याचा शासनाचा कोणताही हेतू नसून राज्यात दर ठरवताना स्थानिक परिस्थिती, विकास दर आणि मागणी–पुरवठा यासारख्या घटकांचा विचार केला जातो. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत आहे, ज्या स्थानिक लोकप्रतिनिधी आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार दर निश्चित करतात. यामध्ये गरजेनुसार काही दर कमी करण्याचा विचारही केला जातो, असे मंत्री श्री.बावनकुळे यांनी सांगितले.मुंबईतील वेगवेगळ्या भागांमध्ये विविध प्रकारची संपत्ती असून, हाय–राईज इमारती, एसआरए प्रकल्प आणि झोपडपट्टी पुनर्वसन योजना यांच्यात मोठा फरक आहे. त्यामुळे प्रत्येक भागासाठी स्वतंत्र 'व्हॅल्यू झोन' ठरवले जातात. रेडी रेकनर दर ठरविताना गरीब आणि मध्यमवर्गीयांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घेतली जाणार असल्याचे मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.यासंदर्भात राज्य सरकार जनतेच्या तक्रारी आणि सूचना गांभीर्याने घेत असून, ९ जानेवारी २०२५ रोजी या संदर्भात बैठक झाली आहे. तसेच, १ एप्रिलपूर्वी जर कोणालाही काही सूचना द्यायच्या असतील, तर त्या सरकारकडे मांडाव्यात, असे आवाहन सुद्धा मंत्री श्री.बावनकुळे यांनी केले. शासन कोणत्याही भागात अवाजवी दरवाढ करणार नाही, तसेच गरज असल्यास काही दर कमी करण्याचाही विचार केला जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.



## सतीश भोसलेच्या घरावर बुलडोझर

# वन विभागाची धडक अन् कठोर कारवाई

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड (वृत्तसंस्था)**

भाजपचा कार्यकर्ता खोक्या उर्फ सतीश भोसले याचे घर जमीनदोस्त करण्यात आले. वन विभागाच्या वतीने सतीश भोसलेच्या घरावर बुलडोझर चालवण्यात आला. तत्पूर्वी त्याच्या घरातील सामान बाहेर काढण्यात आले. खोक्याचे घर वन विभागाच्या जमिनीवर अधिकृतपणे असल्यामुळे ही कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. यावेळी वन विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत पोलिसही उपस्थित होते. शिरुर कासार शहरापासून काही अंतरावर वन विभागाच्या जमिनीवर खोक्या भोसलेचे घर आहे. वन विभागाच्या जागेवर घर बांधल्याने वन विभागाने या घरावर बुलडोझर चालवला.



ढाकणे पिता–पुत्राला मारहाण, पैशांची उधळण करतानाचे फोटो व्हायरल झाल्यानंतर सतीश भोसले उर्फ खोक्या हा चर्चेत आला होता. त्याच्यावर मागील २० दिवसांत तीन गुन्हे दाखल झाले आहेत. तेव्हापासून तो फरार झाला होता. पोलिसांनी काल त्याला प्रयागराज येथून अटक केली होती. मात्र, तो बीडमध्ये येण्याआधीच त्याला वन विभागाने मोठा धक्का दिला आहे. वन विभागाच्या जमिनीवर असलेले त्याचे घर जमीनदोस्त करण्यात आले.

काही दिवसांपूर्वी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सतीश भोसलेच्या घराची झाडाझडती घेतली होती. या कारवाईत खोक्याच्या घरात शिकारीसाठी लागणारे साहित्य, प्राण्यांचे मांस सापडले होते. त्यानंतर त्याच्यावर वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत पहिला गुन्हा दाखल झाला होता.वन विभागाच्या गट क्रमांक ५१ वर सतीश उर्फ खोक्या भोसलेने अतिक्रमण करून घर बांधले होते. याप्रकरणी वन विभागाने सतीश भोसलेवर गुन्हा देखील दाखल केला होता. तसेच या जागेसाठी मालकी हक्क दावा दाखल करण्यासाठी सात दिवसांची मुदत दिली होती. सात दिवसात मालकी हक्क दावा दाखल न केल्यास पुढील कारवाई करून अतिक्रमण करून बांधलेले घर पाडण्याचा इशारा वन विभागाच्या वतीने देण्यात आला होता. त्यानुसार सात दिवसांत मालकी हक्क दावा दाखल न झाल्याने वन विभागाकडून सतीश भोसलेच्या घरावर तोडक कारवाई करण्यात आली. गेल्या २० दिवसांत शिरूर कासार पोलीस ठाण्यात सतीश उर्फ खोक्या भोसलेच्या विरोधात ३ आणि वन विभागाच्या वतीने २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.


# बेवारस वाहने घेऊन जाण्याचे लातूर पोलिसांचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

अनेक महिन्यापासून विविध गुन्ह्यांत जप्त व बेवारस दुचाकी आणि चारचाकी वाहने लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या आवारात लावण्यात आलेली आहेत. सदर वाहने मूळ मालकास परत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. येत्या १५ दिवसांत ही कार्यवाही करण्यात येणार असून नागरिकांनी आपली वाहने घेऊन जावीत असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात येत आहे.

चाकूर, औराद शहाजानी, किल्लारी, गांधी चौक, देवणी पोलीस ठाण्याच्या आवारात गेल्या अनेक महिन्यापासून विविध गुन्ह्यांतील बेवारस वाहने पडून असून दुचाकी व चारचाकी वाहनांचे चेसीस क्रंमाक व इंजीन क्रमांक



याची तपासणी करून वाहन मूळ मालकाला परत देण्यात येणार आहे. वाहनाच्या मालकांनी स्वतः वाहनाचे कागदपत्रासह उपस्थित राहून येत्या १५ दिवसांच्या आत योग्य ती कायदेशीर बाबींची पूर्तता करून वाहन घेऊन जावे, उर्वरित वाहना बद्दल कोणाचीही मालकी सिद्ध नाही झाल्यास कुणाचीही तक्रार नाही असे गृहीत धरून पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ८७ व फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४५८ प्रमाणे बेवारस वाहनांची जाहीर लिलाव प्रकिया राबविण्यात येणार आहे.सदर वाहना संदर्भातील वाहन क्रमांक व चेसीज, इंजिन क्रमांकाची माहिती लातूर पोलीस दलाच्या वेबसाईट https://laturpolice.gov.in/ वर प्रसारित करण्यात आली असून संबंधित पोलीस ठाण्याच्या नोटीस बोर्डवर वाहनाच्या माहितीची लिस्ट लावण्यात आलेली आहे.

# बोरवाडी ग्रा.पं.मध्ये वित्त आयोगातील कामे निकृष्ट करत निधिचा अपहार

## चौकशी करून कार्यवाही करा उपसरपंच सुदाम कोठुळेची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

भोकर तालुक्यातील बोरवाडी ग्रामपंचायत अंतर्गत वित्त आयोगातील होणारी कामे निकृष्ट करून निधिचा दुरूपयोग होत आसल्याची तक्रार बोरवाडी ग्रामपंचायत चे उप सरपंच सुदाम कोठुळी यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती भोकर यांच्या कडे केली आहे.दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, बोरवाडी येथील सरपंच व ग्रामसेवक संगनमताने आपले आर्थिक हीत साधण्यासाठी कुठलीही कामे मासिक सभे मध्ये न मांडता व सदस्यांना विश्वासात न घेता बाहेर हॉटेलमध्ये बसुन प्रोसिडिंग वर घेतली जातात व दुरुस्ती च्या नावाखाली आवश्यकता नसलेल्या ठिकाणी दुरुस्ती दाखवत निधि हाडप केला जातो.



दुरुस्ती बोअरवेल मध्ये नविन मोटार न घेताच जुन्याच मोटारीचा वापर केला जात असुन बसविण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्या देखील आय.एस.आय नामांकन आसलेल्या न खरेदी करता हालक्या दर्जाच्या व कमी लिटरच्या बसवण्यात आल्या असुन काही कामे तर मासिक सभेमध्ये ठराव न घेता आयत्या वेळेचा विषय या नावाखाली अनेक ठराव परस्पर घेत निधी हडप करण्यात आला असुन या मध्ये अंगणवाडी दुरुस्ती व स्वच्छालय दुरुस्ती हि कामे केली आहेत.सरपंच व ग्रामसेवक हे गावकर्यांची व सदस्यांची फसवून करत असुन निधिचा गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामसेवक,सरपंच, संबंधित जे.ई उप अभियंता यांच्यावर चौकशी करुन कारवाई करावी अन्यथा लोकशाही मार्गाने उपोषण करण्याचा इशारा देखील या निवेदनातुन बोरवाडी उपसरपंच सुदाम कोठुळे यांनी दिला असुन या गंभीर विषयावर गटविकास अधिकारी कार्यवाही करणार की टक्केवारी च्या नावाखाली प्रकरण झाकले जाणार या कडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# कोरेगाव–भिमा येथे शुध्द पाणी प्रकल्पासाठी महत्वपूर्ण बैठक संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

गावगाड्याच्या विकासासाठी व लोक कल्याणासाठी सतत धडपडनाऱ्या कोरेगाव भिमा च्या आदर्श सरपंचाने गावातील जनतेला शुध्द पिण्याचे पाणी मिळावं म्हणून प्रकल्प उभारणी करण्यासाठी वन विभाग अधिकाऱ्यांची एक एकर जागा मिळण्याच्या दृष्टीने महत्त्वपुर्ण भेट घेतली.

कोरेगाव भिमा – वाडा पुनर्वसन जल जीवन मिशन अंतर्गत शुद्ध पाणी प्रकल्पासाठी जागा मिळावी यासाठी वन विभाग अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून महत्वपुर्ण बैठक घेतली .सरपंच श्री. संदिपदादा ढेरंगे, माजी सरपंच विजय गव्हाणे, माजी सरपंच अमोल गव्हाणे, दिपक गव्हाणे, तंटामुक्ती माजी अध्यक्ष तानाजी बबन ढेरंगे, नंदकुमार झपके, माजी ग्रामपंचायत सदस्य सुरेंद्र भांडवलकर व ग्रामपंचायत अधिकारी श्रीकांत वाव्हाळ आदि या बैठकीत उपस्थित होते.

# सिरसाळा पोलिसांनी जप्त केलेली वाळू,तहसीलदार यांच्या आदेशाने घरकुल लाभार्थ्यांना वितरण–शैलेंद्र पोटभरे

## शासनाच्या रमाई घरकुल आवास योजनेअंतर्गत शैलेंद्र पोटभरे यांचा सक्रिय पाठपुरावा ; लाभार्थ्यांना वाळू मिळाल्याबद्दल आभार

लोकनेता न्यूज नेटवर्क


**बीड । विजय रोडे**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रत्येक गरीब व्यक्तीला स्वतःचं घर असावे यासाठी रमाई घरकुल आवास योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळत आहे, परंतु घरकुल बांधण्यासाठी वाळू आवश्यक आहे, ज्याची सध्या अत्यंत वाढती किंमत आहे.या संदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीचे मराठवाडा तथा बीड जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मोर्चे आणि निदर्शने आयोजित केली होती. त्यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केला आणि जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन यांच्यात सहकार्य साधून, पोलिसांकडून जप्त करण्यात आलेली वाळू घरकुल लाभार्थ्यांना मिळवून देण्यात यशस्वी झाले.आज सिरसाळा पोलीस ठाण्यात या जप्त केलेल्या वाळूचा वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी मराठवाडा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे , तहसीलदार व्यंकटेश मुंडे, यांच्या आदेशाने जप्त केलेली वाळू घरकुल लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली. या कामात, सिरसाळा ठाण्याचे पी.आय. गोरखनाथ दहिफळे, सिरसाळा मंडळ अधिकारी गणेश फड, सिरसाळा तलाठी सचिन एरंडे, पोहनेरचे तलाठी हनुमंत शिंदे आणि घरकुल लाभार्थी उपस्थित होते.शैलेंद्र पोटभरे यांनी संबोधित करताना सिरसाळा पोलीस ठाण्याला आदर्श जिल्ह्यातील इतर पोलीस ठाण्याने घेणे गरज असल्याचे म्हटले आणि पोलीस तसेच महसूल प्रशासनाचे आभार मानले. या कार्यक्रमात पोलीस प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



## सुट्टीची सुचना

शुक्रवार, दि. १४ मार्च २०२५ रोजी धुलीवंदन असल्या मुळे दैनिक लोकनेता कार्यालयास सुट्टी राहील. त्यामुळे दि.१५ मार्च रोजीचा अंक प्रकाशीत होणार नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी..



# दूध दरात दोन रुपयांची वाढ आता गायीचे दुध ५८ रुपये तर म्हशीचे दूध ७४ रुपये प्रतिलिटर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव | संदीप कदम**

राज्यात दुधाच्या खरेदी दरात अलीकडे सातत्याने वाढ झालेली आहे. त्यामुळे गाय आणि म्हैस दूध दरात प्रतिलिटरला दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के आणि मानद सचिव प्रकाश कुतवळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी १५ मार्चपासून करण्यात येणार आहे. या निर्णयानुसार प्रतिलिटर गायीच्या दुधाची विक्री ५६ वरून ५८ रुपये, तर म्हशीच्या दुधाची विक्री ७२ वरून ७४ रुपये होणार आहे. पत्रकार परिषदेस चितळे दूध पेढीचे संचालक श्रीपाद चितळे, संगमनेर दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह देशमुख आणि कात्रज दूध संघाचे अध्यक्ष स्वप्निल ढमढेरे उपस्थित होते. कात्रज दूध संघाच्या मुख्यालयात सहकारी व खासगी दूध संघाची शिखर संस्था असलेल्या दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाची बैठक अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस राज्यातील सहकारी व खासगी डेअरींचे एकूण ४७ प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यात भेसळयुक्त पनीरची विक्री होत असल्याचे वारंवार समोर आले आहे. त्याबाबत भेसळखोरांवर कडक करवाई करण्याची एकमुखी मागणी बैठकीत दूध संघाच्या प्रतिनिधींनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पुढील



आठवड्यात मुंबईत कल्याणकारी संघाच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन मागण्यांचे निवेदन देण्याचे ठरवले आहे. त्याशिवाय दुग्ध विभागाबरोबर अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री, सचिव यांनाही याबाबत निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती श्रीपाद चितळे यांनी दिली. दुबार दूधसंकलन होणार राज्यात दुधाचे संकलन आता सकाळ आणि संध्याकाळ असे दोनवेळा करण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत झाला. त्यामुळे गुणवत्तापूर्ण दुधाची उपलब्धता ग्राहकांना करणे शक्य होणार असल्याची माहिती कात्रज दूध संघाचे अध्यक्ष स्वप्निल ढमढेरे यांनी दिली. याशिवाय राज्य सरकारच्या दूध अनुदान योजनेत मागील तीन ते चार महिन्यांचे लिटरला पाच रुपयांचे अनुदान प्रलंबित आहे. ते अनुदान लवकर मिळावे, अशी मागणीही बैठकीत केल्याचे त्यांनी सांगितले. मागणी वाढल्याने पावडर, बटरची दरवाढ आंतरराष्ट्रीय बाजारात दूध पावडर आणि बटरला मागणी वाढली आहे. देशांतर्गत बाजारातही मागणी वाढल्यामुळे पावडर व बटरच्या दरवाढीस चालना मिळाल्याची माहिती रणजितसिंह देशमुख यांनी दिली. ते म्हणाले, उन्हाळ्यामुळे आइस्क्रीमला मागणी वाढली आहे. प्रतिकिलोस दूध पावडरचे दर २०० ते २१० रुपयांवरून २४० रुपये आणि बटरचे दर ३७० ते ३७५ रुपयांवरून ४३० रुपयांवर गेले आहेत. त्यामुळे दुधाला मागणी वाढून अलीकडे खरेदी दरात लिटरला पाच ते सहा रुपयांनी वाढ झाली आहे.

# महिलांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा प्रांजल कांबळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची | इम्रान हकीम**



स्पर्धेच्या संगणकीय युगात ग्रामीण भागातील महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आपल्या परिवाराची प्रगती करावी.असे प्रतिपादन सिलिकंट कंपनीच्या एच.आर. प्रांजल कांबळे यांनी फुलगाव ग्रामपंचायत कार्यालयात महिला मेळाव्यात व्यक्त केले. फुलगाव ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने जागतीक महिला दिना निमित्त महिलांना मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला होता त्या वेळी प्रांजल कांबळे बोलत होत्या. या कार्यक्रमाला ग्रामपंचायतीचे प्रशासक शिरीष मोरे ,कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी धीरज घोटाळे,फुलगावच्या लोकनियुक्त मा. सरपंच मंदानानी संपतराव साकोरे पाटील,माजी उपसरपंच शारदाताई भगवान वागस्कर व बायडाबाई पवळे, सारीका अनिल वागस्कर, सर्व बचत गटाच्या अध्यक्षा, उपाध्यक्षा,संचालिका , सामाजीक , धार्मीक , शैक्षणीक राजकीय ,कृषी, कला,क्रीडा व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ महिला,ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी ,आजी,माजी सरपंच,उपसरपंच ,ग्रामपंचायत सदस्या मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.प्रांजल कांबळे पुढे म्हणाल्या महिलांनी सर्व क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून खऱ्या अर्थाने जीवनात गगनभरारी घेतली आहे.महिलांनी भारत देशाचे पंतप्रधान,राष्ट्रपती,विविध राज्याचे मुख्यमंत्री ही उच्च पदे भुशविली आहेत.त्यांच्या पारदर्शक अशा महान कार्याने मेरा भारत महान हा आपला देश स्पर्धेच्या युगात आघाडीवर आहे.फुलगाव ग्रामपंचायतीच्या वतीने सर्व महिलांचा पुष्पगुच्छ,श्रीफळ देवून सन्मान करण्यात आला आलेल्या सर्व महिलांना जागतीक महिला दिनानिमित्त अल्पोपहार देण्यात आला.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन फुलगाव ग्रामपंचायत अधिकारी धीरज घोटाळे यांनी केले.तर आभार फुलगाव ग्रामपंचायतीचे प्रशासक शिरीष मोरे यांनी मानले.

# आरसीएमचा माल आपल्या जिवना साठी लाभदायक-संतोष चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव | माधव बैलकवाड**

भारतामध्ये महिलांची संख्या ही पुरुषांच्या तुलनेमध्ये ५०% आहे पण अद्यापही त्यांचे आरोग्य व आर्थिक बाबतीमध्ये सशक्तीकरण झाले नाही. सरकारच्या महिलांच्या बाबतीत असलेल्या आजपर्यन्तच्या योजनामुळे महिला स्वावलंबी पूर्णपणे स्वावलंबी झाल्या नाहीत तसेच ५०% पेक्षा अधिक महिला ह्या अनामिक आहेत म्हणजेच त्यांच्या शरीरात रक्ताची कमतरता आहे त्यामुळे अनेक आजारांनी त्रस्त आहेत म्हणून महिलांनी मोठ्या प्रमाणात आरसीएम बिजनेसमध्ये जॉईन होऊन कार्य केल्यास ते आरोग्याच्या बाबतीत व आर्थिक बाबतीत सक्षम होतील असे प्रतिपादन आरसीएमचे रुबी अचिवर संतोष चव्हाण यांनी नायगाव येथील ब्लू बेल्स शाळेमध्ये जागतिक महिला दिनाच्या निमिताने आयोजित कार्यक्रमामध्ये प्रमुख वक्ते म्हणून केले अध्यक्षस्थानी संस्थेचे



अध्यक्ष प्राचार्य डॉ. के हरीबाबू हे होते. यावेळी प्रमुख उपस्थिती मुख्याद्यापिका सौ लक्ष्मी हरीबाबू व दीप्ती कोपोलू उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्येची देवता सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ शंकर गड्डमवार यांनी करताना आर्थिक आजादी व नये भारत का निर्माण कैसे करे यावर उपस्थितांना समजावून सांगितले. या प्रसंगी शाळेतील शिक्षक शिक्षिकेनी महिला दिनानिमित आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ हरीबाबू यांनी म्हणाले की, आरसीएमचे सर्वच प्रॉडक्ट हे दर्जेदार व आरोग्यदायी तसेच भेसळ नसलेले शुद्ध आहेत त्याचा वापर मी स्वतः करीत असून त आरोग्याला बुस्ट करणारे आहेत म्हणून सर्व शिक्षकांनी या प्रॉडक्टचा वापर करावा असे आवाहन केले. यावेळी आरसीएमचे रॉयल्टी अचिवर ईश्वर बिजनूरे, रमेश झुंजारे, सुभाष शंकपाळे,बालाजी नुरुंदे,राजेंद्र गायकवाड, मिल्ट्रीमन शिंदे, कु. पूजा आईलवार, जेष्ठ पत्रकार माधव बैलकवाड, गंगाधर कोतेवार, टेलर झगडे,दतात्रय कंदुरके, दत्ता सुर्यवंशी, विलास सर, सुनंदा मामीडवार,यांच्यासह अनेक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संचलन व आभार डॉ गड्डमवार यांनी मानले.

# नाफेड शासकीय हमीभावाने तूर विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू-सभापती रमजान तांबोळी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**



आष्टी तालुक्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी मतदार संघाचे लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथे शासकीय तुर खरेदी केंद्राला मंजुरी मिळाली असून सर्व शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन नोंदणीसुरू झाली असून ऑनलाईन नोंदणी दि.२४ मार्च पर्यंत करून घ्यावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.७५५० प्रति क्विंटल दराने तुर खरेदी केली जाणार आहे.


आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने कडा कृषी उत्पन्न बाजार समितीत नाफेड अंतर्गत दि महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन यांचे सेवा सहकारी सोसायटी लि. जामगाव ता.आष्टी या शासकीय हमीभाव तूर खरेदीकेंद्रांस मंजुरी मिळाली आहे. या हमीभाव केंद्रात ७५५० प्रति क्विंटल दराने तुर खरेदी केली जाणार आहे. शेतकऱ्यांनी सातबारा व ८ अ मूळ प्रत,आधारकार्ड,बँक पासबुक (चालु खाते द्यावे,जनधन खाते देऊ नये),ऑनलाइन पिकपेरा नोंद असणे आवश्यक इत्यादी कागदपत्रासह प्रत्यक्ष येऊन नोंदणी करण्याचे आवाहन सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.तसेच लवकरच प्रत्यक्ष खरेदी सुरू होणार असून शेतकऱ्यांनी कमी दराने तुरीची विक्री न करण्याचे आवाहन केले आहे.

# टाकळी येथे जबरी चोरी, सात लाख रुपयाचा ऐवज लंपास

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर | राजकिरण देशमूख**

तालुक्यातील टाकळी येथे बाबाराव कोंडबाजी मुसळे (वय ५३ वर्षे )व्यवसाय शेती यांच्या घरी दि. १२ मार्च रोजी रात्रीला जबर चोरी झाली. त्यात ७ लाख १३ हजार ८०० रुपये किमती सोन्याचा ऐवज अज्ञात चोरट्यानी लंपास केला. बाबाराव मुसळे हे पत्नीसह शेतात तिळाला पाणी देण्यासाठी गेले होते.ही संधी साधून अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरातील लॉकर तोडून ७ लाख १३ हजार ८०० रुपयांचा सोन्याचा एवज तिजोरी तोडून चोरून नेल्याची घटना दि १२ रोजी रात्री २ वाजता घडल्याने खळबळ उडाली आहे.माहूर तालुक्यातील मौजे टाकळी येथे बाबाराव कोंडबाजी मुसळे हे परिवारासह राहतात त्यांना दोन मुले असुन दोघे नौकरीस असल्याने मुंबई येथे राहतात.ते व त्यांची पत्नी लक्ष्मी असे दोघे जण गावातच राहतात. मुलगा विकास याचा गेल्याच वर्षी विवाह झाला असुन तो मुंबई येथे राहतो. दि १२/०३/२०२५ रोजी रात्री १०.३० वा चे सुमारास ते व पत्नी घराचे दरवाज्यांना व गेटला कुलूप लावून पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेले होते उजेड्यासाठी बॅटरी घेण्याचे विसरल्यामुळे पत्नी ला व बॅटरी घेण्यासाठी परत घरी आलो घरी येवून बँटरी घेतली घराचे दरवाजा व गेट ला कुलूप लावून परत शेतात गेले . बाबाराव मुसळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शेतातील तिळाला पाणी दिल्यानंतर आम्ही रात्री ०२.०० वा घरी परत हा आम्हाला घराचे गेट व मुख्य दरवाज्याचे कुलूप काढलेले व ते दरवाजे उघडे दिसले आम्ही घरात जावून घरातील बेडरूमचे कुलूप काढून दरवाजा उघडा केलेला दिसला बेडरूम मधील लोखंडी कपाट, सींग टेबलचे दरवाजे



उघडे होते. व त्यातील सामान बाहेर अस्तावेस्त पडलेले होते. अस्तावेस्त पडलेल्या कपाटात लॉकर मध्ये ठेवलेल्या सोन्याचे दागीन्याचे रिकामे बॉक्स पडलेले दिसल्याने आम्हास घरात चोरी समजले. त्यानंतर आम्ही घरात इतरत्र पाहणी केली असता किचन रूम मधील देवघराचे ड्राव्हर उघडे एवेळी आम्ही पोलीसांना आमचे घरात चोरी झाल्याचे माहिती दिली. पोलीसांनी घरी येवून घराची पाहणी माहिती घेतली. आज रोजी आमचे घरी पोलीसांचे डॉग पथक व फिंगरप्रिंट पथक यांनी येवून तपासणी तर मी व माझी पत्नीने कपाटातील सामानाची बारकाईने पाहणी केली असता माझे पत्नीने कपाटाचे माझा मुलगा व सुनेस लग्नात भेट दिलेल्या सोन्याच्या दागीन्याचा विविध बॉक्स लॉकर मध्ये ठेवले होते. ११. २,९०,००० - सोन्याचे पाटली जोड एक नग ४० ग्रॅम कि.अ. ०२. ४,१४,०५०/- एका सोन्याचे ग्रॅम कि.अ. ०३. ९७५०/- मणी मंगलसुत्र ५ ग्रॅम कि. अ असे एकूण किंमती ७,१३,८०० रूपये मुद्देमाल रोपीतांनी चोरून नेला आहे.अशी फिर्याद बाबाराव मुसळे यांनी दिल्याने सपोनी शिवप्रकाश मुळे यांनी टाकळी येथे जाऊन घटनेचा पंचनामा करत अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सपोनी शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोऊपनि पालसिंग ब्राह्मण एएसआय बाबू जाधव पोका पवन राऊत हे करीत आहेत.

# सेनगाव येथे राष्ट्रवादी (अजितदादा गटाची) सदस्य नोंदणी व आढावा बैठक संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**

सेनगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने सदस्य नोंदणी व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष मा, बि ,डी बांगर, रामदास पाटील सुमठाणकर ,प्रकाशराव थोरात, सिताराम मामा जावळेकर, बबनराव लांडगे, विकास जी शिंदे, यांच्यासह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते या बैठकीमध्ये गाव तिथे शाखा मजबूत करून सेनगाव तालुक्यामध्ये तालुक्याचे वर्चस्व कायम ठेवण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस मजबुती करण यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून तर या कार्यक्रमा प्रसंगी अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्ष प्रवेश केला व काहींना नियुक्त्या देण्यात आल्या यावेळी सेनगाव तालुका उपअध्यक्षपदी सुभाष झाडे यांची निवड करण्यात आली,

# पत्रकार नवनाथ आडे यांच्या एका फोन वर पाचोड पोलीस प्रशासन एकवटला!

## गुन्हेगारी कमी करण्यासाठी व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पाचोड पोलीस प्रशासन सज्ज

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई | ज्ञानेश्वर उदावंत**

पोलिस दल आणि पोलिस दलातील कर्मचारी बहुतेक करून त्यांचा संवेदनशील, कार्यतत्पर आणि समाजाभिमुख, चेहरा आहे. या पार्श्वभूमीवर नित्याच्या कर्तव्यापलीकडे जाऊन बांधिलकी जपणाऱ्या पाचोड पोलिस प्रशासनाच्या कर्तृत्वाचा वेध ठरत आहे. गेवराई तालुक्यातील राजपिंपरी शिवारातील वाघदारा तांडा येथील एका सामान्य व्यक्तीची तक्रार पत्रकार नवनाथ आडे यांच्याकडे प्राप्त झाली होती की, पाचोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाद झाला आहे. आणि आम्हाला पाचोड पोलीसांची गरज भासत आहे. तसेच तक्रारदाराच्या माहितीनुसार पत्रकार नवनाथ आडे यांनी संबंधित पाचोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना संपर्क करून माहिती दिली. एक फोन करताच सदरील तक्रारदाराला पाचोड पोलीस प्रशासनाकडून लागेल तशी मदत मिळाल्याने कौतुक होत आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाचोड पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील कडीठाण तांडा येथे तक्रार असलेले डिगांबर राठोड यांचे बुधवार दि.१२ रोजी संबंधित नातेवाईकांसोबत काही कारणास्तव वाद निर्माण झाला होता. तक्रारदार हा गेवराई तालुक्यातील रहिवासी असल्याने त्याला स्थानिकच्या लोकांकडून धनकावले जात होते. आणि विशेष म्हणजे संध्याकाळचा वेळ होता. तक्रारदाराने सदरील घडलेला प्रकाराची सबब माहिती पत्रकार नवनाथ आडे यांना दिली. माहिती मिळताच तात्काळ पत्रकार आडे यांनी संबंधित पाचोड पोलीस प्रशासनाला संपर्क करून घटनेची माहिती दिली. त्यांनी तातडीने शासकीय गाडी उपलब्ध करून सोबत तक्रार व एक पोलीस उपनिरीक्षक काही पोलीस कर्मचाऱ्यांसह गाडी घटनास्थळी पाठवली. त्याठिकाणी पोलिसांची गाडी दाखल होताच सदरील ठिकाणाहून आरोपी फरार झाला होता. पोलिसांनी तक्रारदाराला पोलीस ठाण्यात आणून तक्रारदाराची पाचोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. सातत्याने वाढत चाललेल्या गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पाचोड पोलीस प्रशासन सज्ज झाले असल्याचे दिसून आले. आरोपी मार्फत झालेल्या अन्यायाची भावना समजून घेत पत्रकार आणि पोलीस बांधवांचे सहकार्य लाभले.

# बहिण भावाच्या उपचारासाठी १ लाख १९ हजारांची आर्थिक मदत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील मौजै हिप्परगा थडी येथील मिर्झा महेमुद बेग व सलमा बेगम या सख्या भाऊ –बहिनीच्या दोन्ही किडनी फेल झाली आहे त्यात भाऊ मिर्झा महेमुद बेग यांचा उपचार दरम्यान दि ३ फेब्रुवारी रोजी ५ च्या सुमारास निधन झाले. उपचारासाठी घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असुन वडील गावात एका खोलीत चहा विकतात पुढील उपचारासाठी आर्थिक परिस्थिती नसल्याने उपचार करणे अवघड होते.

ही माहिती समाज सेवक सय्यद रियाज यांना कळताच दि २ मार्च रोजी एक वाटसब ग्रुप बनुन सोशल मिडियावर भाऊ –बहिनीच्या उपचारासाठी आर्थिक मदत करावी अशी विनंती केली होती पहिल्या दिवशी पासून दानशूर व्यक्ती कडून १००,२००,५००,१००० अशी मदत मिळायला सुरुवात झाली . ३ मार्च रोजी भाऊ –बहिनीला डायलिसिस साठी रुग्णालयात गेले अस्ता भाऊ मिर्झा महेमुद बेग यांची काही तासांतच तबियत जास्त बिघडली होती पुढील उपचारासाठी अंबुलन्स ने नांदेड येथे उपचारासाठी घेऊन जात अस्तांना मृत्यू झाला. बहीण सलमा बेगम यांच्या उपचार चालू असुन सोशल मीडियाच्या माध्यमातून १ लाख १९ हजारांची मदत मिळाली आहे.




विद्यार्थ्याला प्रामाणिकपणा , शिस्त ,नैतिक मूल्यांच्या विकास , भावनिक बुधिमत्तेचा विकास, घडवून आणण्यासाठी लिट्ल फ्लॉवर कॉन्व्हेन्ट इंग्रजी माध्यम बिलोली येथील शाळेत विविध उपक्रम घेतले जातात त्याचाच एक भाग म्हणजे आजचा छोटासा प्रयोग विद्यार्थ्यानी आपल्या पालकांनी दिलेले खाऊ चे पैसे बचत करून गरजू लोकांच्या मदतीसाठी मोठ्या उदरमतने मदत स्वरूपात छोटीसी मदत म्हणून १२ हजार ७०० रुपये समाज सेवक सय्यद रियाज यांना हि रक्कम दिली . प्राचार्य रजनी मॅडम यांनी मुलांच्या या मदत करण्याची भावना विकसित करण्यासाठी ही छोटासा उपक्रम शिक्षकाच्या माध्यमातून राबवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केले.प्रत्येकी विद्यार्थ्यानी आपल्या सोईनुसार १,२,३,५,१०,२०,५० अशी मदत केली तसेच शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी सुद्धा मदत केली. शाळेतील शिक्षक शंकर जेठे, लंके अदी उपस्थित होते.निधी जमा करण्यासाठी समाज सेवक सय्यद रियाज बिलोली यांना जावेद अहेमद देगलूर, सरपंच रहेबरबेग ,सय्यद उमर हिप्परगा थडी सय्यद सैलानी ,हबीब भाई बोधन शेख सलीम हिमायतनगर, सय्यद फयाज,मुफ्ती सय्यद युनुस,हफिज रईस बेग यांच्या सह अनेकांनी सहकार्य केले.येवडी मोठी रक्कम सोशल मीडियाच्या माध्यमातून जमा झाल्या बद्दल सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

## शितल चाटे यांचा शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्याकडून सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड तालुक्यातील पाली महसुली मंडळाच्या मंडळ अधिकारी सौ. शितल चाटे यांना रयत सामाजिक प्रतिष्ठानकडून प्रशस्तीपत्र व स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या कर्तव्यदाक्षतेची दखल घेत, शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात आज त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

हा सत्कार शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, किसान सेनेचे तालुका संघटक भिमराव कुटे, आणि महिला आघाडीच्या मनिषाताई मुंडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या शिकवणीनुसार महिलांचा सन्मान आणि संरक्षण करणे आवश्यक आहे, याबद्दल उपस्थित सर्वांनी त्या विषयावर आपल्या भावना व्यक्त केल्या.सौ. शितल चाटे यांच्या कर्तव्यदक्षतेचा गौरव करणे हे केवळ त्यांच्या कार्याचेच अभिवादन नाही, तर त्या सर्व महिलांसाठी एक प्रेरणा उदाहरण आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजातील महिलांचे स्थान मजबूत होईल,अशी आशा सर्व उपस्थितांनी व्यक्त केली.

## शालेय पोषण आहारातून अंडी,केळी गायब

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**



> **शालेय पोषण आहारात मिळणारी अंडी आणि केळीची मागणी शासनाने करा म्हणून डिसेंबरपासून अद्याप पत्र आलेले नाही. मागणीचे तसे पत्र आले की आपण दोन दिवसात मागणी करणार आहोत. – दिलीप हैबतपुरे, गट शिक्षण अधिकारी, चाकूर**

विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात मिळणारी अंडी आणि केळी आता गायब झाल्याने शासकीय तसेच शासन अनुदानित शाळांमधील पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेच्या माध्यमातून डिसेंबर २०२३ पासून शासकीय तसेच शासन अनुदानित शाळांमधील पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना नियमित आहाराव्यतिरिक्त आठवड्यातून एकदा अंडी तसेच अंडी न खाणाऱ्या विद्यार्थ्यांना केळी देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. परंतु शासनाने योजनेतील विद्यार्थ्यांना मिळणारी अंडी आणि केळी डिसेंबरपासून बंद केल्यामुळे चाकूर तालुक्यातील १८५ शासकीय व खाजगी शाळांमधील १७ हजार ८०६ विद्यार्थ्यांना अंडी व केळीपासून आता वंचित राहावे लागणार आहे. शालेय पोषण आहार ही योजना केंद्र सरकारने ऑगस्ट १९९५ रोजी सुरू केली. त्या पाठीमागचा उद्देश विद्यार्थी गळती थांबविणे आणि विद्यार्थी उपस्थिती वाढविणे हा होता. नंतर या शालेय पोषण आहार योजनेचे प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना असे नाव बदलण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून डिसेंबर २०२३ मध्ये शालेय पोषण आहारात अंड्यांचा समावेश करून विद्यार्थ्यांची वाढ चांगल्या प्रकारे होऊन त्यांची रोगप्रतिकार शक्ती सुधारण्यास मदत होईल म्हणून विद्यार्थ्यांना अंडी आणि केळी देण्यात येऊ लागली, परंतु त्या विद्यार्थ्यांना अंडीआणि केळीपासून वंचित ठेवायचे कामही शासन करीत आहे. पोषण आहारात विद्यार्थ्यांना अंडी आणि केळी हा मुख्य घटकच मिळत नसल्याने पालक वर्गातून नाराजी वाढली आहे. चाकूर तालुक्यातील शालेय पोषण आहार योजनेतून महिन्याला पहिली ते पाचवी पर्यंतच्या एकूण १०६७२ विद्यार्थ्यांना आठवड्यातील एकादिवशी अंडी आणि अंडी न खाणाऱ्या विद्यार्थ्यांना केळी देण्यात येत असे. तसेच सहावी ते आठवीच्या ७१३४ विद्यार्थ्यांना अंडी आणि केळी दिली जात होती. त्यासाठी महिन्याला जवळपास ५ लाख रुपये खर्च होत असे. ते आता शासनाने बंद केले असून विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारातून अंडी आणि केळी शासनाने बंद केल्याने त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होण्याची शक्यता असून अंडी आणि केळीचा पोषण आहारात समावेश करावा अशी मागणी विद्यार्थी, पालक व नागरिकांतून जोर धरू लागली आहे.

## हाळदा येथे ग्रीस्टॅक योजने संदर्भात शेतकऱ्यांचे मार्गदर्शन शिबिर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**



नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा.राहुल कर्डिले यांच्या आदेशान्वये व मा.उपविभागीय अधिकारी मेंगशेट्टी, मा.तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे हाळदा ता.भोकर येथे ग्रीस्टॅक योजने संदर्भात नुकतेच शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर घेण्यात येऊन या योजने संदर्भात शेतकऱ्यांना इत्तंमभूत माहिती देण्यात आली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी मोघाळीचे मंडळ अधिकारी मा.एस.डी.दंतुलवाड यांनी बोलताना सांगितले की या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना एक शेतकरी कार्ड मिळणार आहे. त्याचबरोबर प्रत्येक शेतकऱ्याला एक युनिक क्रमांकही मिळणार आहे.आपला सात बारा आधार लिंक होणार असल्याने अनेक योजनांचा लाभ एका कार्डावर आपणाला घेता येईल.तेव्हा सर्व शेतकरी बांधवांनी ग्रीस्टॅक योजनेचे हे कार्ड काढणे त्यांच्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा सर्व शेतकरी बांधवांनी हे कार्ड काढून घ्यावे असे सांगितले. या शिबिराला सरपंच चंद्रकांत नागमोड, पत्रकार तथा माजी सरपंच बालाजी नार्लेवाड, ग्रामसेवक ढगे,तलाठी माधुरी गिरी,पोलीस पाटील नागनाथ अमेटवाड आदीसह अनेक शेतकरी बांधव व प्रतिष्ठित नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी साजरी केली रंगोत्सवाची होळी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आर्णी । अनिकेत खारोळ**



तालुक्यातील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा लोणी येथे विद्यार्थ्यांनी रंगांची उधळण करत मोठ्या उत्साहात होळी साजरी केली. या निमित्ताने शाळेच्या प्रांगणात रंगांचा वर्षाव झाला आणि विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता.विद्यार्थ्यांसाठी हा दिवस खास ठरावा म्हणून शाळेच्या शिक्षकांनी विशेष आयोजन केले होते. मुलांनी नैसर्गिक रंगांचा वापर करत एकमेकांना रंग लावले आणि आनंदोत्सव साजरा केला. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना होळी साजरी करण्यामागील संस्कृती आणि त्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच पाण्याच्या गैरवापर टाळण्याचा आणि नैसर्गिक रंगांचा उपयोग करण्याचा संदेशही देण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी होळीच्या पारंपरिक महत्त्वावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी नृत्य, गाणी आणि विविध खेळांमधून आनंद लुटला. होळी हा रंगांचा आणि एकत्रित आनंद साजरा करण्याचा सण आहे, हे विद्यार्थ्यांना या कार्यक्रमातून शिकायला मिळाले.या प्रसंगी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक प आणि गावकरी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि त्यांची उत्साही उर्जा पाहून सर्वांनी या अनोख्या रंगोत्सवाचे कौतुक केले.

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सवानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम गुणवत्ता कक्ष, विद्यार्थी कल्याण मंडळ व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला.

भारतीय राज्यघटनेची ओळख या विषयावर ड. प्रा. अनिल ढवळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. ते म्हणाले की, भारतीय राज्यघटनेची मूलभूत मूल्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता आणि विज्ञाननिष्ठा ही आहेत. ही मूल्ये भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ आहेत. देशाच्या विकासासाठी आवश्यक आहेत. असे ते म्हणाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. महादेव जरे यांनी शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ . प्रकाश साळवे यांनी संविधानाच्या अध्ययनाने समृद्ध नागरिकत्व विकसित होऊ शकते. धर्मनिरपेक्षता टिकून ठेवण्यासाठी नागरिकांमध्ये सहिष्णुता आणि सामंजस्य असणे आवश्यक आहे असे ते म्हणाले.

तसेच प्रश्नमंजूषा स्पर्धा, निबंध स्पर्धा, पोस्टर निर्मिती स्पर्धा यांसारख्या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. याशिवाय, राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. अर्चना फुलारी यांनी केले. आभार समन्वयक प्रा. डॉ. हरिभाऊ वाघिरे यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ. राजेंद्र ठाकरे, प्रा. रमेश थोरात, डॉ. रावसाहेब काळे, डॉ. सुप्रिया पवार, प्रा. सिद्धार्थ बर्वे, डॉ. राजाराम कानडे, प्रा. देवेंद्र बहिरम, प्रा. नाना वागस्कर, प्रा. वैशाली घोडके महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सद्गुरू श्री संत गुणवंत महाराज यांचा आळंदीत प्रगट दीन साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

सद्गुरू श्री संत गुणवंत महाराज प्रगट दिनानिमित्त प्रतिमापूजन, आणि महाप्रसादाचा कार्यक्रम खंडोबा मंदिर रोड भाजी मंडईत आयोजित करण्यात आला, प्रतिमा पूजन आळंदी पोलीस स्टेशन च्या पोलीस उपनिरीक्षक सोनाली फुले यांच्या हस्ते करण्यात आला. आरतीचा मान आळंदी नगरपरिषद अतिक्रमण विभाग प्रमुख सचिन गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला व कार्यक्रमाला उपस्थित आळंदी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक काकडे, आळंदी नगरपरिषद मिथील पाटील,सोमनाथ वैरागे,ह.भ.प. जाधव महाराज,पुणे जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्षः महंमद हकीम उपस्थित होते,कार्यक्रमात कीर्तनाचा कार्यक्रम ह.भ.प अमोल महाराज जाधव यांनी दिले,कार्यक्रमाचे नियोजन जय जय गुणवंत फाउंडेशनचे पदाधिकारी राहुल रायबोले महाराज, निलेश ढोकणे, गजानन मिटकरी,गणेश मुंजाळ,संतोष बवले यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुणे जिल्हा अध्यक्ष संतोष सोनवणे यांनी केले.

# मतीमंद चिमुकल्यांच्या चेहर्यावर हस्य फुलवत होळीचा आनंद द्विगुणित झाला!-बह्माकुमारी ज्योती बहेजी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

भारतीय सांस्कृती ही विविध सण–उत्सवाच्या परंपरेने नटलेली आहे.याच परंपरेनुसार दरवर्षीच होळीचा सण होळीचा येतो.कला शिक्षक दत्तात्रय एमेकर यांच्या सुंदर अक्षर कार्यशाळा कंधार आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ कंधार यांच्या संयुक्त विद्यमानाने कंधार शहरातील छत्रपती शाहू महाराज मतीमंद विद्यालयात शासकीय गुत्तेदार वैजनाथ सादलापूरे यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३ मार्च २०२५ रोजी दुपारी होळीचा रंगोत्सव कार्यक्रम पार पडला.



या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रजापिता ब्रम्हकुमारीज कंधारच्या संचालिका ज्योती बहेनजी,श्री शिवाजी हायस्कूल कंधारचे मुख्याध्यापक सदाशिव आंबटवाड,मा.सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी चुकलवाड,माजी संघटना कंधारचे तालूकाध्यक्ष अर्जुन कांबळे,सचिव पी.व्ही वाघमारे,सेवारत भारतीय सैनिक शिवहार कागणे,डॉ.सौ.अर्चनाताई भगवान जाधव,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष जमीर बेग,योगगुरु नीळकंठ मोरे,कंधार मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष दीपक चालीकवार,श्री शिवाजी हायस्कूल शिक्षक अजहर बेग,वृक्षमित्र वनरक्षक शिवसांब घोडके अनेक बांधव उपस्थित होते.

सर्व मान्यवर अतिथींचा सत्कार मतीमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष बदरखे यांचे सहित सर्व स्टाफनी यथोचित सत्कार केला. हिंदवी बाणा साप्ताहिकाचा बूरा न मानो होती हैं।हा यंदाचा होळी विशेषांकाचे मान्यवरांच्या समर्थ हस्ते विमोचन करण्यात आले.या कार्यक्रम प्रसंगी पत्रकार संभाजी कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त ज्योती बहेनजी यांचे समर्थ हस्ते अभिष्टचिंतन केले.मतीमंद शाळेतील चिमुकल्यांच्या गळ्यात साखरेचे अन् खारीक खोबऱ्याचे हार घालून त्यांना फळांचा खाऊ देऊन होती सणाचा आनंद द्विगुणित करण्यात आला.या प्रसंगी पत्रकार रमेशसिंह ठाकूर,दिगांबर वाघमारे,माधव भालेराव,शुभम केंद्रे,निलेश गायकवाड,संतोष सोमाचे, एस.पी.केंद्रे,हणमंत मुसळे उपस्थित होते,यावेळी सत्कार करण्यात आला.वृक्षमित्र वनरक्षक शिवसांब घोडके यांनी पांढरा पांगरा या दुर्मिळ वृक्ष रोपाची भेट मुख्याध्यापक संतोष बदरखे यांना भेट देवून सत्कार केला.शाळेतील सर्व कोंडेवाड पी.एस.,पांचाळ जी.पी.शिरबरतळ आर.एम. अरविंद रोडगे,निलेश शेटे, गीरी महाराज, बालाजी अयतलवाड,बुरपूले आय.टी.,कुलकर्णी एस.बी.सुमन मुंडे,पूरी डी.एम.आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिगांबर वाघमारे यांनी तर योगगुरू निळकंठ मोरे यांनी आभार मानले .

> “ या कार्यक्रमात प्रमुख अतिथी ज्योति बहेनजी यांनी विचार मांडतांना होली अर्थात् जो बात हो गई, बीत गई उसको बिल्कुल खत्म कर देना। बीती को बीती कर आगे बढ़ना यही है होली मनाना। बीती हुई बात ऐसे महसूस हो जैसे बहुत पुरानी कोई जन्म की बात है, जब ऐसी स्थिति हो जाती है तब पुरुषार्थ की स्पीड तेज होती है। तो अपनी या दूसरों की बीती हुई बातों को कभी चिन्तन में नहीं लाना, चित्त पर नहीं रखना और वर्णन तो कभी नहीं करना, तब ही तीव्र पुरुषार्थी बन सकेंगे।असे महत्त्व विशद केले.

## सौ.वंदना परिवंत गायकवाड यांना स्त्री रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा गौरव,तसेच ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांचा सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

या कार्यक्रमाची माहिती समजली.या महत्वपूर्ण कार्यक्रमाला कड्याचे माजी सरपंच आणि इतर मान्यवर उपस्थित होते हे खरोखरच प्रशंसनीय आहे.

जागतिक महिला दिनानिमित्त कडा कृ.उ.बा.समितीच्या संचालिका सौ. वंदना परिवंत गायकवाड यांना स्त्री रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला,तसेच ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांचाही सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला कड्याचे माजी सरपंच रामशेठ मधुरकर,सरपंच परिवंत गायकवाड, सरपंच बळी गिते,संजय गायकवाड, राजू गायकवाड आणि लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष आण्णासाहेब साबळे,तालुका उपाध्यक्ष रविंद्रनाथ ठाकूर,आणि तालुका सचिव अशोक माने उपस्थित होते.

## मा.आ.मोहनराव हंबर्डे यांचे जनसंपर्क कार्यालय कौठा येथे राष्ट्रवादी सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**



नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनवाढीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्ष अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिलेल्या आदेशानुसार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे व राष्ट्रवादी काँग्रेस नांदेड जिल्हाचे नेते आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिण नांदेड चे माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांनी अधिकाधिक सदस्य नोंदणीवर भर दिला असून गुरुवार दि. १३ मार्च ते २२ मार्च सकाळी ११ ते रात्री ८ पर्यंत कौठा येथील त्यांच्या मध्यवर्ती संपर्क कार्यालयात सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे.पक्षाध्यक्ष अजितदादा पवार यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत संपूर्ण राज्यात पक्षबांधणी आणि संघटन वाढीवर भर दिला जात असून याचाच एक भाग म्हणून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोहनराव हंबर्डे यांनीही सदस्य नोंदणीची ही मोहीम हाती घेतली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसची विचारधारा जनमानसात रुजावी, समाजातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला, युवा वर्गासह तळागाळातील समाज घटकांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून सर्वांगीण विकास व्हावा, विविध शासकीय योजनांची माहिती त्यांना मिळावी, हा पक्षाध्यक्ष अजितदादा पवार यांचा मानस आहे. येत्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस जिल्ह्याच्या राजकारणात अव्वलस्थानी असला पाहिजे, हे स्वप्न साकार करण्यासाठी समाजातील प्रत्येकांसोबत राष्ट्रवादीची नाळ जोडली पाहिजे, अशा सूचना अजितदादा पवार यांनी नांदेड दौर्यात दिल्या होत्या. पक्षश्रेष्ठींनी दिलेले आदेश शिरसावंद्य मानून मोहनराव हंबर्डे यांनी पक्ष सदस्य नोंदणी अभियान सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. गुरुवार दि. १३ ते २२ मार्च सकाळी ११ ते रात्री ८ पर्यंत सुरु राहणार्या या अभियानात जास्तीत जास्त कार्यकर्ते, पदाधिकार्यांनी सहभागी होऊन सभासद नोंदणीसाठी पुढाकार घ्यावा आणि हे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन मोहनराव हंबर्डे यांनी केले आहे.

## आ,सुरेश धसचा कार्यकर्ता सतीश भोसले उर्फ खोक्या बीड पोलिसाकडून प्रयागराज येथून अटक!

### पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या टीमने लोकेशन घेत अट्टल गुन्हेगार खोक्याचा आवळल्या मुसक्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**




आरोपी सतीश उर्फ खोक्या भोसले मोर,हरीन, या प्राण्याची हत्या करून तस्करी करणाऱ्या मागील सहा दिवसापासून फरार होता, त्याच लोकेशन घेत उत्तर प्रदेश प्रयागराज येथे असल्याची गुप्त माहिती मिळताच बीड पोलीस पथक प्रयागराज येथे दाखल उत्तर प्रदेश पोलीस याच्याशी समन्व्य साधून अटक करण्यात आली अशी माहिती बीडचे पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी दिली, त्यावर ३०७,चे अनेक गन्हे दाखल असल्याचे बोलल्या जात आहे, बुलढाणा जिल्ह्यातील शिरूर कासार येथे आणून त्याचे चार ते पाच साथीदार यांनी मारहाण करण्यात आली होती, यातच दिलीप ढाकणे, महेश ढाकणे या बापलेकाला मारहाण व्हिडिओ शूट करत मारहाण करण्यात आली, या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता, यातच शिरूर पोलीस व वनविभाग यांनी सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या घरावर छापा टाकला असता, हरीन चे कातडी वाळलेले मांस शिकारीचे साहित्य मिळून आले, भाजपचे आमदार सुरेश धस यांचा निकटवर्तीय असल्याचे बोलल्या जात आहे,

## आय.सी.टी.(माहीती संप्रेषण व तंत्रज्ञान) करतेय शिक्षणासाठी वरदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशनराव गायकवाड**




सौ. सुनंदा पी. ससाणे मुख्याध्यापिका कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, उमरी यांच्या माहितीवरून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षात नव्याने सुरु अतिल्या आय.सी.टी.. या विषयामुळे विद्यार्थीमध्ये सुरु झालेल्या अभ्यासाच्या दृष्टीकोनातून अमुलाग्र बदल होत आहेत. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय उमरी येथे आय.सी.टी. इन.म्हणून श्री पिटलेवाड के. एन. हे रुजु असुन ते विदयार्थ्यांना कॅम्पुटर बद्दलचे धडे शिकवतात. डिजीटल इंडियाच्या स्वप्नपूर्ती साठी हे अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक तंत्राचा वापर करून, नेहमीचे विषय शिकवण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाची रुची वाढवण्यासाठी येणाऱ्या काळामध्ये विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा निश्चित फायदा होईल असे मत सौ. सविता बिरगे मॅडम, शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी व्यक्त केले आहे, तसेच या उपक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी श्री. कुलकर्णी एन.ए. यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## परळी बाजारपेठेत होळी आणि रंगपंचमीची धामधूम नैसर्गिक रंगांना अधिक पसंती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



होळीचा सण परळी शहरात उत्साहाचे वातावरण आहे. यानिमित्त परळीतील बाजारपेठ रंगीबेरंगी सजली असून, विशेषतः रंगपंचमीसाठी लहानग्यांची खरेदीची लगबग वाढली आहे.

सध्या बाजारात विविध प्रकारच्या पिचकार्यांसह नैसर्गिक रंगांची मागणी वाढली आहे. विशेषतः कार्टून थीमवरील पिचकार्यांना लहानग्यांकडून मोठी पसंती मिळत आहे. होळी आणि रंगपंचमीचा आनंद लुटण्यासाठी मुले आधीच पाण्याच्या पिशव्यांचा मारा करताना, तसेच पिचकार्यांमधून पाणी उडवत धमाल करताना दिसत आहेत.

यंदा बाजारात रंग आणि पिचकार्यांचे दर सुमारे १० टक्क्यांनी वाढले असल्याचे विक्रेते सचिन पाचनकर यांनी सांगितले. तरीही रंगपंचमीप्रेमींकडून नैसर्गिक रंगांना अधिक मागणी असल्याचे दिसून येत आहे. बाजारपेठेत चैतन्याचे वातावरण असून, सणासाठी खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे.

## भायेगाव येथील महिला पोलिस पाटील सौ.सुमन खोसडे यांना आदर्श महिला पोलिस पाटील पुरस्काराने सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनिल शिंदे**



नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या भायेगाव ता.जि.नांदेड येथील महिला पोलिस पाटील सौ.सुमन शिवानंद खोसडे पाटील भायेगावकर,यांना नांदेड जिल्हा पोलीस दलातर्फे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते ११ मार्च रोजी देण्यात आला.

नांदेड जिल्हा पोलीस दलातर्फे ११ मार्च रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस पाटील मेळावा व कार्यशाळा आदर्श पोलीस यांच्या सत्कार आयोजित करण्यात आला होता, ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी विविध कार्यक्रम मध्ये अग्रेसर व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सौ.खोसडे यांच्या नावाची शिफारस केली होती. नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यातील जवळपास हजारो पोलीस पाटील यांच्यी उपस्थिती होती यावेळी नांदेड दक्षिण तालुक्यातील ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या एकमेव भायेगाव येथील सौ.सुमनबाई खोसडे यांनी शांतता समितीसह विविध जयंती उत्सव निमित्ताने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत एकमेव पोलीस पाटील म्हणुन सौ.खोसडे यांना बहुमान मिळाला. यावेळीअप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरूव,अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या सह अधिकारी यांच्या उपस्थितीत सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सौ. सुमन खोसडे पाटील(आदर्श पोलीस पाटील) पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल पोलीस पाटील लवकुश अवनुरे,संजय इंगळे पाटील, गोविंद तेलंगे, श्रद्धा विजय खटके,संतोष मोरे ,वसंत पल्लेवाड,आंनद पवार , पांडुरंग हंबर्डे, राज्य पुरस्कार प्राप्त खंडेराव बकाल व प्रविण हंबर्डे,यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904